## पडताळणी

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७०/२०२६** **निशाणी क्र.५**

तक्रारदार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची पडताळणी,

मी देवाच्या नावाने शपथ घेतो की मी जे सांगेन ते सत्य असेल,

संपूर्ण सत्य असेल आणि सत्याशिवाय दुसरे काहीही नाही.

माझे नाव : बालाजी हणमंतराव शेटकार,

माझे वय : ४६ वर्षे, धंदा : शेती,

राहणार : नागलगाव, ता. उदगीर, जि. लातूर.

धिरज हिंदुराव मकदुम हा माझ्या मावस भावाच्या मुलाचा मित्र होता. धिरजचा जे.सी.बी. व पोकलेनचा व्यवसाय आहे. सदर व्यवसायामध्ये त्याला अडचण आल्याने त्याने दि.०५.१०२०२५ रोजी माझ्याकडे हातउसणे रु.१,५०,०००/- ची मागणी केली. आमच्यातील मित्रत्वाचे संबंध तसेच त्याची अडचण विचारात घेऊन मी त्यास त्याच दिवशी मी रु.१,५०,०००/- रोख स्वरुपात दिले. आमचे सामाईक मित्र व्यंकट माधवराव बोंद्रे यांच्या समक्ष सदर रक्कम दिली. सदर रक्कम ८ दिवसांसाठी हातऊसनी दिली होती. सदर ८ दिवसानंतर मी त्यास त्या रकमेची मागणी केली असता त्याने सुरुवातीला थोडे थांबण्याची विनंती केली. त्यानंतर त्याने दि.१५.१०.२०२५ रोजी सदर थकीत रकमेच्या परतफेडीपोटी मला धनादेश क्र.३४७७८४ हा अॅक्सीस बँकेचा रु.१,५०,०००/- चा दिला. सदर धनादेश मी मुदतीत वटण्यासाठी डी.सी.बी. बँक शाखा मादलापूर येथील बँकेत टाकला असता तो न वटता ''पेमेंट स्टॉप्ड बाय ड्रॉवर'' या कारणाने दि.०६.११.२०२५ च्या मेमोने परत आला. त्यानंतर दि.०४.१२.२०२५ रोजी आरोपीला नोटीस पाठवुन सदर धनादेशाच्या रकमेची मागणी केली. सदर नोटीस आरोपीने दि.०६.१२.२०२५ रोजी स्वीकृत केली. त्याने सदर नोटीसला उत्तर दिले परंतु सदर धनादेशाची रक्कमही भरली नाही. त्यानंतर मी प्रस्तुत तक्रार न्यायालयात दाखल केली आहे. तरी, माझे पैसे आरोपीकडून मिळावेत व त्यास नियमाप्रमाणे शासन व्हावे.

समक्ष,

(निवेदकाची स्वाक्षरी)

१७.४.२०२६

(भालचंद्र रा. झेंडे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्या.क्र.३), उदगीर.

दिनांक : १७.०४.२०२६